# भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका
## बांधकाम विभाग

**विषय – नाले गटार मो-या बांधणे या लेखाशिर्षामध्ये पुनर्विनियोजन करणेकामी अर्थसंकल्पीय तरतूदीचे प्रशासकीय ठराव करुन घेणेबाबत.**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ६३,६६,६७ (क),९०,३१९ कलम अन्वये जनतेच्या सेवेसाठी किंवा सुरक्षिततेसाठी मा.स्थायी समितीच्या मान्यतेने भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात विविध ठिकाणी विकास कामे करण्यासाठी आर्थिक तरतूद करणे हे मा.आयुक्त सा.ो. यांचे अधिकार आहेत. त्याप्रमाणे या अधिनियमाच्या कलम ९५ व ९६ प्रमाणे दरवर्षी उत्पन्न व खर्च करण्यासाठी लेखाशिर्ष निहाय तसेच बाब निहाय आर्थिक तरतूद करण्यात आली होती. या तरतूदी मधून आतापर्यंत खर्च झाल्याचा तपशिल खालील प्रमाणे.

| अ.क्र. | लेखाशिर्षकाचे नाव | सन २०२३-२४ करीता करणेत आलेली तरतूद | दि.५/१२/२०२३ पर्यत नोंदविलेली तरतूद रककम | दि. ५/१२/२०२३ पर्यंतची शिल्लक | शेरा (मुळ तरतूद + पुनर्विनियोजनाने घेतलेली तरतूद सह रक्कम) |
|---|---|---|---|---|---|
| १ | नाले गटार मो-या बांधणे | रु. ५३८.७३ लक्ष | रु.५३८.७१ लक्ष | ०.०२ लक्ष | (५००.००+३८.७३ = ५३८.७३ लक्ष) |
| | एकूण | रु. ५३८.७३ लक्ष | रु.५३८.७१ लक्ष | ०.०२ लक्ष | |

सन २०२३-२०२४ या वित्तीय वर्षाचा जो अर्थसंकल्प मंजूर झाला आहे, त्यामधील नाले गटार मो-या बांधणे या लेखाशिर्षामधील निधी संपलेला आहे. खालील विषयांकित काम करावयाचे असल्याने कामाचे अंदाजपत्रकीय मुल्य रु. १२.०० लक्ष आहे. मात्र नाले गटार मो-या बांधणे या लेखाशिर्षामध्ये निधी शिल्लक नसल्यामुळे इतर लेखाशिर्षकामधून पुर्नविनियोजन करुन निधी उपलब्ध करणे आवश्यक आहे. तरी खालील कामाकरीता वरील लेखाशिर्षामध्ये "नविन कर्मचारी निवासस्थान बांधणे " या लेखाशिर्षामधुन रु. १२.०० लक्ष रुपयाचे पुर्नविनियोजन करावयाचे आहे.

| कामाचे नाव | रक्कम | शेरा |
|---|---|---|
| वार्ड क्र.१६ मधील वाघपाडा येथे नविन गटर व पायवाट तयार करणे. | रु. १२.०० लक्ष | |
| एकूण | रु. १२.०० लक्ष | |

खालील लेखाशिर्षामधून पुनर्विनियोजन करावयाचे आहे.

| अ. क्र. | लेखाशिर्षाचे नाव | सन २०२३-२४ करीता करणेत आलेली तरतूद | दि. ५/१२/२०२३ पर्यत नोंदविलेली तरतूद रक्कम पुनर्विनियोजनाच्या रक्कमेसह (खर्च) | दि. ५/१२/२०२३ पर्यंतची तरतूद शिल्लक रक्कम | पुनर्विनियोजना करीता घ्यावयाची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | नविन कर्मचारी निवासस्थान बांधणे | रु.३००.०० लक्ष | रु.२७८.८३ लक्ष | रु.२१.१७ लक्ष | रु.१२.०० लक्ष |
| | एकूण | रु.३००.०० लक्ष | रु.२७८.८३ लक्ष | रु.२१.१७ लक्ष | रु.१२.०० लक्ष |

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम १०२,कलम १०३ व कलम १०४ अन्वये एखादया लेखाशिर्षाखाली रक्कम खर्च झाली नाही व त्यात बचत झाली तर या नियमाच्या आधारे अनुदानाच्या तुलनेत जादा होणारा खर्च बचतीच्या रक्कमांचा उपयोग करून भागवीता येवू शकतो व असे पुनर्विनियोजन करण्याचे अधिकार मा.आयुक्त सो यांचे मान्यतेने मा.स्थायी समितीस सादर करणे आवश्यक आहे. मात्र सध्या स्थायी समितीचे अधिकार मा.प्रशासक तथा आयुक्त सा○. यांच्याकडे निहीत आहेत.

वार्ड क्र.१६ मधील वाघपाडा येथे नविन गटर व पायवाट तयार करणे.विषयांकित कामाकरीता निधीचे पुर्नविनियोजन करणेकामी कनिष्ठ अभियंता, प्रभाग समिती क्र.३ यांनी मुळ संचिकेसह प्रस्ताव सादर केलेला आहे. त्या अनुषंगाने नाले गटार मो-या बांधणे या लेखाशिर्षामध्ये "नविन कर्मचारी निवासस्थान बांधणे " या लेखाशिर्षामधून रु.१२.०० लक्ष रुपयाचे पुर्नविनियोजन करणे आवश्यक असून त्याचा स्वतंत्र नमूना क्र.१० नियम ३० (३) प्रस्ताव तयार केला आहे.

त्यास मा.प्रशासक तथा आयुक्त सा○. यांनी दिनांक १५/१२/२०२३ रोजी मान्यता दिलेली आहे. तरी यासाठीचा प्रशासकीय ठराव मंजुर करुन घ्यावा ही विनंती.

**ठराव क्र.** ३०८ **दिनांक** १८/१२/२०२३

वार्ड क्र.१६ मधील वाघपाडा येथे नविन गटर व पायवाट तयार करणे. विषयांकित काम करणेकरीता नाले गटार मो-या बांधणे या लेखाशिर्षामध्ये तरतुद (निधी) शिल्लक नसल्यामूळे "नविन कर्मचारी निवासस्थान बांधणे" या लेखाशिर्षामधून एकूण रु. १२.०० लक्ष रुपयाचे नाले गटार मो-या बांधणे या लेखाशिर्षामध्ये पुर्नवियोजनाने निधी वर्ग करणेस महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र.एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) नवि-१४ दि.६ जुन २०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी श्री.अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त उपरोक्त शिफारस केल्याप्रमाणे मान्यता देत आहे.

(अजय वैद्य)
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका**

नमुना क्र.१०

नियम ३० (३) पहा

भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,भिवंडी

| या लेखाशिर्षातुन | | | | | | या लेखाशिर्षाकरिता | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र | प्रधान,गौण व तपशिलवार माहिती | बांधकाम विषयक सेवा व इतर | मुळ अनुदान पर्यंत खर्च | आज तारखे पर्यंत खर्च | उपलब्ध शिल्लक | प्रधान,गौण व तपशिलवार माहिती | बांधकाम विषयक सेवा व इतर | मुळ अनुदान पर्यंत खर्च | आज तारखे पर्यंत खर्च | प्रस्तावित वाढीची रक्कम खर्च | अभिप्राय |
| १ | भांडवली खर्च भाग-४ | अ-२/३ नविन कर्मचारी निवासस्थान बांधणे | सन २०२३-२४ करीता रु.३००.०० लक्ष | सन २०२३-२४ करीता रु.२७८.८३ लक्ष | सन २०२३-२४ करीता रु.२१.१७ लक्ष | भांडवली खर्च भाग-४ | नाले गटार मो-या बांधणे | सन २०२३-२४ करीता रु.५३८.७३ लक्ष | सन २०२३-२४ करीता रु.५३८.७१ लक्ष | रु.१२.०० लक्ष | प्रभाग समिती क्र.३ अंतर्गत नविन गटार व पायवाट बनविणेकामी नविन कर्मचारी निवासस्थान बांधणे या लेखा मधून नाले गटार मो-या बांधणे या लेखा मध्ये रु.१२.०० लक्ष रुपये पुर्नविनियोजनाने प्रस्तावित करण्यात येत आहेत. |

टिप्पणीत अभिप्रायानुसार.

शहर अभियंता
भिवंडी नि.शहर मनपा

मुख्य लेखा परिक्षक
भिवंडी नि.शहर मनपा

मुख्य लेखा व वित्त अधिकारी
भिवंडी नि.शहर मनपा

अति. आयुक्त
भिवंडी नि.शहर मनपा

प्रशासक तथा आयुक्त
भिवंडी नि.शहर मनपा